आकर्षक... कलागुणसंपन्न... तरीही अतृप्त

# मॅरिलीन मन्रो

श्रीकांत मुंदरगी

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**आकर्षक... कलागुणसंपन्न... तरीही अतृप्त मॅरिलीन मन्रो**
श्रीकांत मुंदरगी

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
श्रीकांत मुंदरगी
'शिल्पसंकेत'
श्री मातोश्री गणेश मंदिरामागे,
नागाळापार्क, कोल्हापूर - ४१६००३
फोन नं. ०२३१-२६५३८२८ मो. नं. : ९३७००२८०७४

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ४२०/-

## *लेखकाचा अल्प परिचय*

श्रीकांत मुंदरगी गेली बेचाळीस वर्षं कोल्हापुरात जनरल आणि प्लास्टिक सर्जन म्हणून कार्यरत आहेत. लेखन, चित्रकला, अभिनय, फोटोग्राफी आणि बॅडमिंटन हे त्यांचे आवडीचे छंद. त्यांच्या घरी दुर्मीळ पुराण वस्तूंचा संग्रह असून त्यांची स्वत:ची आर्ट गॅलरीही आहे. 'इंडियन एक्स्प्रेस', 'इलस्ट्रेटेड वीकली', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाइम्स', 'सकाळ', 'तरुण भारत', 'केसरी', 'पुढारी' इत्यादी वृत्तपत्रांतून आणि आघाडीच्या अनेक दिवाळी अंकांतून त्यांनी विविध विषयांवर लेखन केलं आहे. आजवर त्यांनी चारशेच्यांवर समाजप्रबोधनात्मक भाषणं केली आहेत. अभिनय आणि नाट्यदिग्दर्शन या क्षेत्रातही त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. दूरदर्शनवर पुरस्कृत मालिकांचा प्रारंभ झाला, त्या काळात डॉक्टरांची 'जॉकी' ही चाकोरीबाह्य मालिका प्रदर्शित झाली होती.

हार्ट ॲटॅक या विषयावर त्यांनी सखोल संशोधन केलं आहे. सदर विषयावर लघुपट बनवण्यात आला आहे. या विषयावर व्हिडिओ आणि ऑडिओ कॅसेटही काढण्यात आल्या आहेत. व्याधीविकार आणि जरामरणावर मात करणारे स्टेमसेल्स या विषयाचा त्यांनी सविस्तर अभ्यास करून आणि युरोप-अमेरिकेतील अनेक रिसर्च इन्स्टिट्यूट्सना भेटी देऊन त्यावर अनेक माध्यमांतून लेखमालिका प्रकाशित केल्या आहेत. नॅनोटेक्नॉलॉजी आणि स्टेमसेल्स या विषयांवर पीएचडी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी त्यांची गाईड म्हणून निवड करण्यात आली आहे.

डॉक्टरांनी अनेक नामवंत व्यक्तींच्या वैयक्तिकरीत्या वैयक्तिकरीत्या मुलाखती घेतल्या आहेत. त्यांनी अमिताभ बच्चन या महानायकाची त्याच्या घरी जाऊन घेतलेली मुलाखत काही वर्षांपूर्वी बरीच गाजली होती आणि आजवर ती निरनिराळ्या माध्यमातून लहानमोठ्या फॉरमॅटमध्ये प्रसिद्धही झाली आहे. १९७२ साली अमेरिकेत युस्टन टेक्सासमध्ये शिकत असताना ते 'नासा'ला भेट देण्यासाठी गेले होते. त्या वेळी चंद्रावर पाऊल टाकणारा पहिला माणूस नील आर्मस्ट्राँग

याला भेटून त्याच्याशी चार शब्द बोलण्याचं भाग्य त्यांना लाभलं. स्व. बाबा आमटे, मदर तेरेसा, ऑस्कर विजेत्या भानू अथैया यांच्याही मुलाखती डॉक्टरांनी घेतल्या आहेत. टोकियो ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीचं ब्राँझपदक पटकावणाऱ्या पै. खाशाबा जाधव यांची अॅपेंडिक्सची शस्त्रक्रिया करण्याचं श्रेयही त्यांच्या खाती जमा आहे.

कथासंग्रह, कादंबऱ्या आणि चरित्रं अशी अनेक पुस्तकं डॉक्टरांनी लिहिली असून त्यांनी अलीकडंच लिहिलेलं 'मधुबाला' हे पुस्तक अतिशय वाचकप्रिय ठरलं आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मधुबालाचं चरित्रात्मक पुस्तक आवडल्याचं अक्षरश: हजारो वाचकांनी फोन, एसएमएस आणि पत्राद्वारे कळवलं. इतकंच नव्हे तर चित्रपटसृष्टीतल्या काही नामवंत कलावंतांवर लिहावं अशी आग्रहाची विनंती केली. त्या विनंतीला मान देऊन डॉक्टरांनी 'जेम्स बॉन्ड' आणि 'मॅरिलीन मन्रो' या दोन विषयांवर लेखन केलं आहे. ही दोन्ही पुस्तकं रिया पब्लिकेशन्सतर्फे प्रकाशित होत आहेत. 'मीनाकुमारी' आणि 'वॉल्ट डिस्ने' या विषयांवर लेखन चालू आहे. 'फूलनदेवी', 'बेनझीर भुट्टो' आणि 'दुसऱ्या महायुद्धातील धुरंधर व्यक्ती आणि कथा' ही रिया पब्लिकेशन्सनं प्रकाशित केलेली पुस्तकंही वाचकांना आवडली आहेत. 'वाळूत उमललेलं फूल' हे अत्यंत वेगळ्या विषयावरील पुस्तक वाचकांना आवडलं आहेच शिवाय ते विविध पुरस्कारांनी सन्मानित झालं आहे.

शिक्षण, संशोधन आणि कॉन्फरन्सेसच्या निमित्तानं डॉक्टरांनी जगातील बहुतांशी देशांचे दौरे केले असून त्यांना विविध क्षेत्रातील कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

डॉक्टरांच्या वैद्यकीय कार्यासह अनेक क्षेत्रांतील कामगिरीत त्यांच्या पत्नी सौ. सुहासिनी यांचं मोलाचं सहकार्य लाभल्यामुळंच डॉक्टरांना भरीव यश मिळवणं शक्य झालं आहे. अनुभवसंपन्न, सुसंस्कृत आणि समृद्ध जीवन जगणाऱ्या या दांपत्याला दोन मुली आणि दोन मुलं असून त्या सर्वांनी भारतात आणि परदेशात आपापल्या क्षेत्रात उत्तम नावलौकिक मिळवला आहे.

✦✦✦

# *मनोगत*

मॅरिलीन मन्रो ही जागतिक सिनेसृष्टीतील अशी एकमेव अभिनेत्री आहे की, जिच्या जीवनावर जास्तीत जास्त पुस्तकं लिहिली गेली आहेत, जास्तीत जास्त लघुपटांची निर्मिती करण्यात आली आहे आणि जास्तीत जास्त दीर्घ चित्रपट काढण्यात आले आहेत. तिच्यावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांची संख्या आजमितीला ८३५ च्या जवळपास भरते. त्यामुळे असं छातीठोकपणे म्हणता येईल की, २०२६ सालापर्यंत ही संख्या सहजपणे सुमारे हजाराच्या घरात जाऊ शकेल. वाचकांच्या मनात हा प्रश्न निश्चितपणे उभा राहील की, २०२६ सालच कशासाठी विचारात घ्यायचं? त्याचं सरळ सोपं उत्तर आहे की, मेरिलीन जन्मली १९२६ साली. म्हणजे तिची जयंती २०२६ सालीच येणार ना? वर्षाला दहा पुस्तकांची सरासरी धरली, तर तिच्याबद्दलच्या पुस्तकांचं सहस्रक १०० वर्षांत सहज पूर्ण होईल.

असं काय जगावेगळं मॅरिलीन मन्रो या स्त्रीत होतं की, इतकी अफाट प्रसिद्धी तिच्या वाट्याला यावी? वाचकांच्या मनातल्या अशा अनेक प्रश्नांची उत्तरं सदर पुस्तकात देण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न केलाय.

'एका सुरेख नाट्यगीताची आठवण मॅरिलीनला पाहून मनात येते–

रतिहून सुंदर मदन मंजिरी
मदनाचे वरदान तुला
ललित कोमला तव सुंदरता
लाजविते मंदार फुला
बघुनी तुला गगनात खंगते
कलेकलेने चंद्रकला
कळे न मजला वृथा फुलांचा
नाद कशाला हवा तुला?'

जगातल्या अनेक भाषांतून मॅरिलीनवर काव्यं लिहिली गेलीत; पण मराठीतल्या या गीताची सर अन्य कोणत्याही काव्याला येत नाही.

मॅरिलीन मन्रो अत्यंत गरिबीत जन्माला आली. ती अनेक अनाथाश्रमांतून लहानाची मोठी झाली. बालपणी तिला ना आईची माया लाभली, ना पित्याचं छत्र लाभलं. तरीही तिनं शून्यातून विश्व निर्माण केलं. तिची आई वेडसर आणि विकृत होती. बापाचा शोध घेत मेरिलीन वणवण भटकत राहिली. त्याचा शोध लागताच

ती धावत त्याला भेटायला गेली, तर तिला दारातूनच माघारी धाडण्यात आलं. ती जागतिक कीर्तीची अभिनेत्री बनल्यावर तिच्या पित्यानं तिला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा तिनं त्याची भेट घेण्याचं नाकारलं. मॅरिलीनची आई सतत तिला पाण्यात पाहत होती; पण या मातृवेड्या लेकीनं तिला मिळणाऱ्या घासातले दोन घास आईसाठी कायम बाजूला काढून ठेवले. तिला एक सावत्र बहीण होती; पण सख्ख्या बहिणीपेक्षा जास्त प्रेम तिनं तिच्यावर केलं.

'चित्रपटसृष्टीतील महानायिका मधुबाला' हे रिया पब्लिकेशन्स प्रकाशित केलेलं पुस्तक अल्पावधीत विलक्षण लोकप्रिय झालं. गेल्या सोळा महिन्यांत पुस्तकाच्या जवळजवळ पन्नास हजार प्रती खपल्या. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून वाचकांचे फोन मला आणि प्रकाशकांनाही येऊ लागले, त्यांची संख्या हजाराचा आकडा पार करून गेली आहे. एस. एम. एस.ची संख्या तर अगणित होती. ते वाचून त्यांना उत्तर देणं, इतर व्याप आणि वेळेअभावी मला केवळ अशक्य असल्यामुळं मी वाचकांची मनापासून क्षमा मागतो. या अभूतपूर्व प्रतिसादाचं श्रेय श्री. शीतल मेहता यांच्या कल्पकतेलाच द्यावं लागेल. कारण महाराष्ट्रातल्या बऱ्याच लहानमोठ्या शहरात ते पुस्तकांची प्रदर्शनं भरवतात आणि वाचकांना परवडतील अशा किमतीत ती पुस्तकं देतात. प्रत्येक मराठी माणसाच्या घरी स्वत:च्या हक्काचं ग्रंथालय असावं ही त्यांची कल्पनाच क्रांतिकारक म्हणावी लागेल.

माझी इतरही काही पुस्तकं मेहतांनी प्रकाशित केलीत, ती म्हणजे बेनझीर भुट्टो, मर्दानी स्त्री फूलनदेवी आणि दुसऱ्या महायुद्धातील धुरंधर व्यक्ती आणि कथा. या पुस्तकांनाही चांगला प्रतिसाद मिळतो आहे; पण मधुबालाची सर त्यांना नाही. यामागचं कारण म्हणजे मधुबाला हा विषयच तसा वाचकांच्या काळजाला हात घालणारा आहे.

मधुबाला वाचून मी चित्रपटसृष्टीतील आणखी काही कलावंतांवर लिहावं अशा आशयाचे अनेक फोन आले. त्यांनी त्यांच्या आवडीच्या कलावंतांची नावंही सुचवली. माझ्यावर त्यांनी जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी राहीन; पण त्याआधी श्री. मेहतांना माझ्याकडून जेम्स बॉन्ड आणि मेरिलीन मन्रो हे विषय लिहून हवे होते. गेलं वर्षभर बरंच वाचन, संशोधन, चिंतन आणि मनन करून मी दोन्ही पुस्तकं पूर्ण करून त्यांना दिली. वाचकांना ही पुस्तकंदेखील आवडतील, अशी मी आशा बाळगतो.

मॅरिलीन मन्रोचं सारं जीवन म्हणजे झपाटून टाकणारा एक अद्‌भुतरम्य विषय आहे. ती जाऊनही पन्नास वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला तरी जागतिक जनमानसातलं तिच्याविषयीचं औत्सुक्य ओसरलेलं नाही वा तिच्याबद्दल वाटणारं कुतूहल कणभरही कमी झालेलं नाही. युरोप, विशेषत: अमेरिकेत अधून मधून घेतल्या जाणाऱ्या

सर्वेक्षणात मेरिलीन मन्रो गेल्या शंभर वर्षांत सर्वांत जास्त रसिकप्रिय अभिनेत्री ठरली आहे, हा एक चमत्कारच म्हणावा लागेल.

मॅरिलीन मन्रो या नावाविषयी थोडंसं स्पष्टीकरण. तिच्या नावाचा उच्चार स्पेलिंगप्रमाणे मॅरिलीन मन्रो असा होतो; पण रसिक प्रेक्षक तिला मॅरिलीन मन्रो या नावानंच ओळखतात. ते नाव प्रवाही आहे आणि कानालाही ऐकायला गोड वाटतं. ते सेक्सीही आहे, असं हॉलिवूड मानतं. बालवयातच मॅरिलीनला चित्रपटसृष्टीविषयी आकर्षण वाटू लागलं. थोडी मोठी होताच अभिनेत्री होण्याची ती स्वप्नं पाहू लागली. ती स्वप्नं सत्यात उतरविण्यासाठी तिनं आकाशपाताळ एक केलं. चांगल्या भूमिका मिळवण्यासाठी तिनं तीस-एक पुरुषांशी बऱ्यावाईट शृंगारलीला केल्या. संसारसुख मिळावं म्हणून तिनं तीन विवाह केले. तीसएक चित्रपटांतून कामं केली. शेवटी शेवटी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांची पत्नी बनून 'व्हाईट हाऊस'ची 'फर्स्ट लेडी' बनण्याचं अशक्यप्राय स्वप्न तिनं पाहिलं. सुख, शांती आणि समाधान यांच्या शोधात मॅरिलीननं आपलं आयुष्य वाऱ्यावर उधळून लावलं; पण ही मृगजळं शेवटपर्यंत तिच्या हाती आली नाहीत.

सेक्स सिम्बॉल बनण्यासाठी मॅरिलीननं अंगावरची वस्त्रं हजारो लोकांसमोर उतरवायला कधी संकोच बाळगला नाही. अंगावरचा स्किन कलरचा ड्रेस काढून टाकून विवस्त्रावस्थेत पोहण्याचं दृश्य देण्यासाठी ती पोहण्याच्या तलावात उतरली तेव्हा ती कशी दिसली असेल?

'की कालिंदीवर करण्याला जलकेली
कुणी यक्षलोकीची रूपगर्विता आली
त्या नितळ दर्पणी विवस्त्र होऊन पाही
निज लावण्याची उसासलेली वेली'

'ताजमहाल'चं यमुनेच्या पाण्यात पडलेलं प्रतिबिंब पाहून एका प्रतिभावंत कवीला हे काव्य सुचलं ते मॅरिलीन मन्रोच्या जलक्रीडेला अचूक लागू पडावं. कारण वाढतं वय, व्यसनं आणि विविध व्याधी या गोष्टींनी तिच्या सौंदर्यावर मुळीच आघात केले नाहीत. संगमरवरी शिल्पासारखी ती शेवटपर्यंत सुरेख आणि सुडौल होती. सुरुवातीला रसिक मॅरिलीनला सेक्स सिम्बॉल या उपाधीनं गौरवू लागले; पण 'नायगारा' आणि 'दि सेव्हन इयर' या चित्रपटांमुळं सारं जग तिला 'सेक्स गॉडेस' म्हणून ओळखू लागलं.

लोकप्रियतेच्या शिखरावर असताना कोट्यवधी रसिकांची लाडकी सौंदर्यशलाका अल्पकाळ विद्युल्लतेसारखी त्यांची अंधारलेली मनं उजळून अचानक अंधारात अंतर्धान पावली. तिच्या छत्तीस वर्षांच्या आयुष्यात ती जितकी प्रसिद्ध आणि लोकप्रिय झाली त्याहून अनेक पटींनी जास्त प्रसिद्धी आणि लोकप्रियता मृत्यूनंतर तिच्या वाट्याला आली.

ब्यूटीज मस्ट डाय यंग...? सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप असतो का? मधुबालासारखी अनुपमेय लावण्यवती आणि असामान्य अभिनेत्री वयाच्या छत्तीसाव्या वर्षी गेली. ट्रॅजिडी क्वीन मीनाकुमारी चाळिशीच्या आतच अनंतात विलीन झाली. साऱ्या जगानं डोक्यावर घेतलेली डायना स्पेन्सर अपघातात मृत्युमुखी पडली, त्यावेळी तिचं वय काय होतं?

१९३० च्या दशकातली हॉलिवूडची सेक्स सिम्बॉल जीन हार्लो तर वयाच्या अवघ्या सव्वीसाव्या वर्षी स्कार्लेट फीव्हरसारख्या दुर्धर आजाराला बळी पडली. नियती किती निष्ठूर आणि निर्दय असते नाही?

मॅरिलीन मन्रोनं अतिरिक्त प्रमाणात झोपेच्या गोळ्या घेऊन आत्महत्या केली, अशीच बातमी आली; पण या सिद्धांताला तडे जाणारे अनेक पुरावे वेळोवेळी पुढं येत गेले. त्यामुळे तिचा अकल्पित, अनपेक्षित आणि अचानक झालेला मृत्यू हा आत्मघात होता की अपघात होता की, घातपात होता, हे कोडं आजवर सुटू शकलेलं नाही. मॅरिलीन मन्रोच्या विलक्षण जीवनकहाणीवर आणि गूढ मृत्यूवर प्रकाश टाकण्याचा हा माझा एक अल्पसा प्रयत्न. रसिक वाचकांनीच तो कसा वाटतो ते ठरवावं.

मॅरिलीन मन्रोची जीवनकहाणी लिहायची तर त्यासाठी काही निवडक संदर्भ ग्रंथ वाचणे आवश्यक होते. भारतात तशी पुस्तकं फारशी उपलब्ध नव्हती. मी आमच्या अमेरिकास्थित कन्येला मृणालिनीला कळवताच तिनं सखोल अभ्यास करून काही पुस्तकं पाठविली. मुंबईच्या हायकोर्टात फौजदारी वकील म्हणून नावारूपाला आलेल्या माझ्या धाकट्या चिरंजीवानं-निरंजननंही अमेझॉनच्या वेबसाईटवर पाहून काही पुस्तकं मागवून मला दिली. सर्वांत महत्त्वाचे संदर्भ इंटरनेटवर उपलब्ध होते. माझ्या नातीनं प्रणोतीनं तीन-चारशे पानांचे प्रिंटआऊट्स काढून मला ई-मेलवर पाठवून दिले. या सर्वांचे आभार मानावेत तर ती सारी आमची जवळची आणि जिव्हाळ्याची माणसं. त्यांना शुभेच्छा देऊन मोकळं झालेलं बरं!

माझी पत्नी सुहासिनी माझ्या प्रत्येक साहित्यकृतीचा पहिला वाचक, टीकाकार आणि प्रूफ रीडर. तिच्यामुळंच आजवर मी माझ्या आयुष्याची वाटचाल यशस्वी करू शकलोय. तिचे आभार मानण्यापेक्षा तिच्या ऋणात राहणं मी पसंत करतो.

श्री. शीतल मेहतांबद्दल बोलावं तितकं कमीच आहे. ते भेटले नसते तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात माझं नाव पोहोचलं नसतं. त्यांच्या योजकतेला माझे लाख सलाम.

डॉ. श्रीकांत मुंदरगी

९३७००२८०७४, (०२३१) २६५३८२८

✦✦✦

# नौसैनिकांचा उन्माद

सुमारे तीस ते पस्तीस हजार नौसैनिक समोरच्या पटांगणात जमले होते. घरंदारं, बायकामुलं, आयाबहिणी, आप्तेष्ट आणि स्नेहीसुहृदांना सोडून ते तिथं आले होते. कोरियाच्या रणभूमीवर ते महिनोगणती लढत होते. चार-चार दिवस आंघोळीला पाणी मिळायचे नाही. दाढी करायला सवड मिळायची नाही. अंगावरच्या कपड्यांना वास यायचा. कधी कधी चार-चार दिवस अर्धपोटी राहून शत्रूशी लढत राहावं लागायचं. महिनोगणती स्त्री औषधालादेखील दिसायची नाही. सैनिकांच्या तंबूत हॉलिवूडच्या नट्यांचे फोटो चिकटवलेले असत. एलिझाबेथ टेलर, जोन क्रॉफर्ड, जेन रसेल इत्यादी सुंदर सुंदर तारकांचे फोटो लावलेले असायचे; पण सर्वांत जास्त छायाचित्रं कुणाची असतील तर ती म्हणजे मॅरिलीन मन्रो या नटीची. ती त्यांची साक्षात प्रेमदेवताच होती. लैंगिकतेचं मूर्तिमंत प्रतीक असलेली मॅरिलीन मन्रो म्हणजे मादकतेची प्रतिमाच जणू! साऱ्या जगात तिची ख्याती पसरलेली होती, ती म्हणजे सर्वांगसुंदर सेक्स सिम्बॉल म्हणून. ती स्वत: तिथं येऊन त्यांना दर्शन देणार होती. इतकंच नव्हे, तर ती नाचून-गाऊन त्यांची घटका-दोन घटका करमणूक करणार होती. त्यांच्या ध्यानीमनी, स्वप्नी दिसणारी ती त्यांची लाडकी परी त्यांना प्रत्यक्ष समोर पाहता येणार होती. ते सारे नौसैनिक डोळ्यांत प्राण आणून चातकासारखी तिची वाट पाहत होते.

अखेरीस एकदाचा तो हेलिकॉप्टरचा घरघराट त्यांना ऐकू आला. त्या साऱ्यांनी निळ्याशार आकाशाकडं पाहिलं. ते हेलिकॉप्टर हळूहळू खाली येऊ लागलं. मॅरिलीन दारात उभी राहून एका हातानं सैनिकांच्या जल्लोषाचा स्वीकार करत होती. जणू एखादी आकाशस्थ अप्सरा स्वर्गातून खाली उतरत आहे, असाच त्यांना भास झाला आणि ते हजारो सैनिक जिवाच्या आकांतानं ओरडू लागले. 'मॅरिलीन... मॅरिलीन... मॅरिलीन.'

तिच्या नावाचा तो गगनभेदी कंठरव ऐकून मॅरिलीनच्या अंगावर सरसरून काटा आला. ती रोमांचित होऊन गेली. तिचा अणूरेणू पेटून उठला. शक्य असतं तर ती त्याच क्षणी प्रत्येक सैनिकाला मिठीत घेऊन त्याच्याशी रत झाली असती; पण ते

शक्य नव्हतं. तशी अद्भुत शक्ती तिच्या अंगी असती तर तिनं नक्कीच तसं केलं असतं. होतीच तशी ती अतिरेकी!

दोन सैनिक अधिकाऱ्यांसमवेत ती हेलिकॉप्टरमधून उतरली आणि तात्पुरत्या उभ्या केलेल्या स्टेजच्या मागच्या आडोशाला जाऊन बरोबर आलेल्या मेकअपमनच्या मदतीनं तिनं झटपट हलका मेकअप केला आणि बरोबर आणलेला पारदर्शक पोषाख अंगावर चढवला.

समोर हजारो सैनिक हात उंचावून तारस्वरात तिच्या नावाचा जयघोष करीत होते. .... मॅरिलीन... मॅरिलीन... मॅरिलीन. क्षणभर तिचं अंग ताठरलं. भीतीची एक अनामिक लहर तिच्या अंगातून विद्युल्लतेसारखी दौडत गेली. आपल्या घशातून आवाजच फुटला नाही तर? आपलं गाणं बेसूर झालं तर? आपलं नृत्य चुकलं तर? आणि मग एकदम तिला पेंडलटन कॅम्पची आठवण झाली.

....लॉस एंजल्सच्या जवळपास असलेल्या अमेरिकन सैनिकांच्या करमणुकीच्या कार्यक्रमासाठी मॅरिलीनला निमंत्रित करण्यात आलं होतं. कारण त्यावेळी तिच्या नावाभोवती लोकप्रियतेचं प्रखर वलय निर्माण झालं नसलं तरी तिचं नाव वृत्तपत्रांतून, मासिकांतून आणि टी.व्ही. चॅनल्सवरून गाजू लागलं होतं. तिचे चित्रपट लोकप्रिय होऊ लागले होते ते केवळ तिच्या नावामुळं. कथा कशी आहे? नायक कोण आहे? छायाचित्रण कसं आहे? हे प्रश्न आता प्रेक्षक विचारेनासे झाले होते. त्या चित्रपटात ती चिकणी, छाकटी आणि मादक बाधक मॅरिलीन मन्रो आहे ना? मग झालं तर! सेक्स सिम्बॉल अशी बिरुदावली तिला चिकटू लागली होती. तिला पाहण्यासाठी तिच्या भूमिका असलेल्या चित्रपटांना गर्दी होऊ लागली होती. तिच्या वाढत्या लोकप्रियतेमुळं ज्यो डिमॅजीओसारखा बेसबॉल खेळणारा तिच्या प्रेमात वेडा झाला होता. तो अमेरिकेचा सर्वाधिक लोकप्रिय खेळाडू होता. तो अफाट पैसे मिळवत होता. तो देखणा नसला तरी रुबाबदार आणि धट्टाकट्टा होता. मॅरिलीनला मिठीत घेऊन तो तिच्यावर शारीरिक सुखाची बरसात करत होता. तिनं त्याच्याशी लग्न करावं म्हणून तो तिच्या मागं लागला होता; पण मोठ्या खुबीनं त्याच्यावर चुंबनांचा वर्षाव करून ती त्याची मागणी लांबणीवर टाकत होती. तिला लग्नाची घाई मुळीच नव्हती.

दहा-पंधरा हजार सैनिकांसमोर गायची, नाचायची ही तिची पहिलीच वेळ होती. त्यामुळं ती भेदरून गेली होती; पण त्या सैनिकांनी तिच्या नावाचा जयघोष केल्यामुळं तिची भीती कुठल्या कुठं पळून गेली. ती बेभानपणे हात उडवत गाऊ लागली,